# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २१ वा ❑ बुधवार दि.१९ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# राजधानीत अभिजात मराठीचा अभुतपूर्व जागर

## ९८ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनात भरगच्च कार्यक्रम

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी दिल्ली** –यंदाचे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन येत्या शुक्रवारपासून (दिनांक २१ फेब्रुवारी) नवी दिल्लीतील छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी (तालकटोरा स्टेडिअम) मध्ये होत आहे. २१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान कवी संमेलन, मुलाखती, परिसंवाद, चर्चा असे वेगवेगळे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, यंदाच्या साहित्य संमलेनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ग्रंथदिंडीची सुरुवात देशाच्या संसदेतील छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून होणार आहे. लोकशाहीच्या मंदिरातून साहित्याच्या मंदिराकडे असा प्रवास ही ग्रंथदिंडी करणार आहे, अशी माहिती साहित्य संमेलन आयोजक असणाऱ्या सरहद संस्थेचे प्रमुख संजय नहार यांनी दिली. दिल्लीत त्यांनी यासंबंधी पत्रकार परिषद घेतली. यावेळी सरहदचे डॉ. शैलेश पगारिया, लेशपाल जवळगे उपस्थित होते.

संजय नहार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरीत ९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन होत असून या संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. २१ फेब्रुवारीला दुपारी ३.३० ला विज्ञान भवनात हा कार्यक्रम होईल. या उद्घाटन सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर,




**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५**

स्वागताध्यक्ष शरद पवार यांची प्रमुख उपस्थिती असेल. राज्यातील साहित्यिकही या साहित्य सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर संध्याकाळी ६.३० वाजता उद्घाटनाचे दुसरे सत्र संमेलनस्थळी होणार असून याप्रसंगी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक कार्य मंत्री अशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती असेल. मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे यांचे पूर्वाध्यक्ष भाषण होईल, तर संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांचे अध्यक्षीय भाषण होईल.

तत्पूर्वी सकाळी ग्रंथ दिंडी काढण्यात येणार असून ध्वजारोहण होईल. साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे याच्या हस्ते ग्रंथदिंडीस प्रारंभ होणार असून नॅशनल बुक ट्रस्टचे चेअरमन मिलिंद मराठे, मावळते संमेलनाध्यक्ष डॉ.रविंद्र शोभणे, राज्याचे सांस्कृतिक सचिव विकास खारगे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असेल. ग्रंथदिंडीची सुरुवात संसदेतील छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून होईल, या दिंडीत साहित्यिक, साहित्यप्रेमी, मराठी मंडळी सहभागी होणार आहेत. विविध कला पथकेही या दिंडीत सहभागी होतील, असेही संजय नहार म्हणाले.

संमेलनाच्या ठिकाणी मोठ्या संख्येने प्रकाशकांचे स्टॉल असणार आहेत, तसेच याठिकाणी संत महापती मंच असून तिथे इच्छूक साहित्यिकांच्या पुस्तकांचे प्रकाशन होईल. या साहित्य संमेलनास देशाबाहेरूनही साहित्यिक मंडळी येणार असल्याचे संजय नहार म्हणाले.

**साहित्य संमेलनासाठी विशेष रेल्वे**

१९ फेब्रुवारीला पुणे येथून साहित्य संमलेनासाठी विशेष रेल्वे दिल्लीकडे येणार आहे. या रेल्वेमध्येही साहित्य संमेलन होणार आहे. या विशेष रेल्वेला महादजी शिंदे एक्सप्रेस असे नाव देण्यात आले आहे. तसेच प्रत्येक रेल्वे डब्याला गड-किल्ल्यांची नावे देण्यात आलेली आहेत. या रेल्वेमध्ये होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत असणार आहेत. यावेळी बोलताना संजय नहार यांनी सांगितले की, अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या ३ दिवसांमध्ये कोणते कार्यक्रम घ्यावे हा अधिकार साहित्य महामंडळाचा असतो. त्यामुळे महामंडळाच्या नियमानुसारच कार्यक्रम होणार आहेत. मात्र संमेलनाच्या निमित्ताने आम्हाला काही कार्यक्रम घेता येतात, तसे जवळपास १०० विविध कार्यक्रम झाले. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिले संमेलन आहे. ही एक आनंदाची गोष्ट आहे. इतिहासात दिल्ली जिंकताना मराठ्यांचा तळ तालकटोरा स्टेडियम होते. त्या जागेवर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. संजय नहार म्हणाले की, साहित्य संमेलन हा उत्सव कुठल्या खासगी संस्थेचा नाही तर महाराष्ट्राचा आहे. साहित्य संमलेनात परिसंवाद, काव्य संमेलन असे भरगच्च कार्यक्रम तीन दिवस होणार आहेत. जवळपास १०० पुस्तके संमेलनात प्रकाशित होतील, असा अंदाज आहे. दिल्लीतील लोकांना पुस्तकांसाठी ही मोठी संधी आहे, असेही ते म्हणाले.

### इंग्लड, पाकिस्तानमधून लोकांची उपस्थिती

साहित्य संमलेनाला पाकिस्तानातील कराची, इंग्लंड आणि अन्य काही देशांतून लोक येत आहेत. लंडनमधून एक व्यक्ती पुस्तक प्रकाशन करण्यासाठी येणार आहेत. व्यवस्थेबाबत बोलताना डॉ. शैलेश पगारिया म्हणाले की, संमेलनाला महाराष्ट्रातून २७०० लोक येतील अशी अपेक्षा आहे. आतापर्यंत १८०० लोकांची व्यवस्था झाली आहे. दिल्लीत वेगवेगळ्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था केली आहे. तर याबाबत बोलताना नहार म्हणाले की, व्यवस्था नाही म्हणून काही लोक येण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे शक्य असेल तर दिल्लीतील मराठी लोकांनी आपल्या घरी काही लोकांना ठेवावे, ही आमची विनंती आहे, असेही ते म्हणाले.

## विशेष लेख...

# लोकांनी मर्यादा आणि नियम पाळले पाहिजेत

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

कुंभमेळ्या प्रमाणेच दिल्ली रेल्वे स्टेशनवर परत एकदा चेंगराचेंगरी होवून १८ पेक्षा जास्त प्रवाशांचा मृत्यू झाला. महाकुंभ मेळ्यासाठी प्रयागराजला निघालेल्या प्रवाशांमध्ये स्थानकावर ट्रेनचा प्लॅटफॉर्म बदलल्यामुळे एकच गोंधळ उडाला. सर्व लोक ट्रेन पकडण्यासाठी घाई करु लागले. अशा परिस्थितीत पुलावर बसलेले प्रवासी चिरडले गेले त्यांच्यासोबतच अनेकजण मृत्यूच्या दाढेत लोटले गेले. परत एकदा व्यवस्थापनाचा प्रश्न समोर आला. प्रवाशी स्वैरवैरा पळू लागले. सर्व नियम व मर्यादा पायदळी तुडविण्यात आल्याने परत एकदा चेंगराचेंगीचा प्रश्न समोर आला. प्रयागराज मध्येच नव्हे तर जिथं जिथं लोकांची गर्दी होत असते तिथे लोकांनी मर्यादा आणि नियम पाळले तर कुठलीच अनुचित घटना घडणार नाही. मात्र लोक नियमाचे पालन करत नाहीत म्हणून नको त्या घटना घडतात. प्रयागराज मध्ये महाकुंभ मेळा लोकांनी व येणाऱ्या भक्तांनी संयम, राखला, मर्यादा पाळली तर कायदा व सुव्य व्यवस्था राखण्यात अडचण येणार नाही. सरकार आपल्या परीने व्यवस्थापन व नियोजन करत आहे. मात्र इतक्या मोठ्या लोकसंख्येवर नियंत्रण राखणे कठीण होत आहे. याचा फायदा असामाजिक तत्व घेतात. यागराजमध्ये महाकुंभ मेळा सुरू आहे. या महाकुंभात आता पर्यंत ५० कोटी लोकांनी प्रयागराज येथे पवित्र स्नान केले आहे. पहिल्या दिवसापासूनच प्रयागराजमध्ये भक्तांची प्रचंड गर्दी बघायला मिळत आहे. महाकुंभमेळा हा जगातील सर्वात मोठे सार्वजनिक संमेलन आहे. या मेळाव्यात तपस्वी, संत, साधू, साध्वी, कल्पवासी आणि सर्व स्तरातील यात्रेकरूंचा समावेश असतो.

वर्षातील सर्वात मोठ्या कार्यक्रमांपैकी एक असलेल्या महाकुंभ मेळा २०२५ मध्ये जगभरातून गर्दी होत आहे. महाकुंभाच्या पहिल्या दिवशी, सुमारे १.३ कोटी लोकांनी पवित्र स्नान करून या शुभ कार्यक्रमाची सुरुवात केली. जगभरातून भाविक, साधू आणि परदेशी पर्यटक आणि प्रतिनिधी या भव्य कार्यक्रमाला भेट देत असल्याने, यात्रेकरूंच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी काटेकोर व्यवस्था करणे महत्त्वाचे आहे. तथापि, उत्तर प्रदेश सरकारने २०२५ च्या महाकुंभ मेळ्याच्या प्रत्येक पैलूचे काटेकोरपणे नियोजन केले आहे. हा भव्य कुंभ उत्सव गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांच्या पवित्र संगमाला आध्यात्मिकतेच्या उत्साही उत्सवात रूपांतरित करतो, लाखो यात्रेकरूंना आकर्षित करतो. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारकडून चोख बंदोबस्त करण्यात आला आहे. महाकुंभमेळ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सरकार प्रगत तंत्रज्ञान आणि ड्रोन निगराणीचा वापर करते. या मेळाव्यात गर्दी नियंत्रणासाठी विविध उपाय केले जातात. जागोजागी पोलिस बंदोबस्त आहे. तरी देखील या दरम्यान अप्रिय घटना घडल्या. प्रयागराजमध्ये भरलेल्या महाकुंभमेळ्यात आग लागण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. या आगींमुळे अनेक मंडप जळून खाक झाले आणि मोठा गोंधळ उडाला. आग लागण्याच्या घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली. काही असामाजिक तत्वांकडून हिंसक घटना घडवून आणल्या जात आहे..या पार्श्वभूमीवर भक्तांनी नियमांचे पालन केले तर कोणतीही अप्रिय घटना घडणार नाही..

**कुंभमेळ्यात मौनी** आमेस्येला जी चेंगराचेंगरी झाली त्याला सरकार, प्रशासन व भक्त देखील तितकेच जबाबदार आहे. ४५ दिवसांच्या बहुप्रतिक्षित महाकुंभमेळ्यासाठी ७,५०० कोटी रुपयांचे प्रचंड बजेट असूनही , २९ जानेवारी रोजी उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये पहाटे झालेल्या चेंगराचेंगरीत, ज्यामध्ये ३० जणांचा मृत्यू झाला, हे सरकारद्वारे जगातील सर्वात मोठ्या धार्मिक मेळाव्याचे वर्णन केलेल्या कार्यक्रमाच्या घोर गैरव्यवस्थापनाकडे लक्ष वेधते. प्रत्यक्षदर्शींनी अविचारी नियोजनाच्या घातक संयोजनाला जबाबदार धरले असले तरी, टीकाकारांनी नदीकाठच्या प्राणघातक गर्दीसाठी ''व्हीआयपी हक्कांची संस्कृती'' कारणीभूत असल्याचे म्हटले आहे. २९ जानेवारी रोजी, ज्या दिवशी ही दुर्घटना घडली त्या दिवशी मौनी अमावस्येला सुमारे १० कोटी यात्रेकरू मेळ्यात सहभागी झाले होते असे मानले जाते.या पार्श्वभूमीवर सरकार, प्रशासन कुठ तरी कमी पडली, हे सरकारने देखील मान्य केले. मात्र लोकांनी संयम राखायला पाहिजे. नियमाचे पालन करायला पाहिजे.स्वयंशासन हे उत्तम शासन व प्रशासन असते..यामुळे कुठल्याच प्रकारची जीवित व वित्त हानी होत नसते..नियम पाळणे म्हणजे अनुशासनमध्ये राहणे. नियम पाळल्याने आपले काम योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने होते आणि त्यामुळे यश मिळते.

# बोरकरांच्या कवितेप्रमाणे हळवी जादू असणारी कविता म्हणजे मृणाल देशपांडे ह्यांची कविता–प्रविण दवणे


## भावस्पंदन काव्य संग्रहाचे प्रकाशन थाटात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – दि.१६ फेब्रुवारी रोजी कवयित्री मृणाल देशपांडे लिखित भावस्पंदन काव्यसंग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध गीतकार, कवी मा.प्रविण दवणे ह्यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा.प्रवीण दवणे ह्यांनी भूषविले. प्रमुख पाहुण्या म्हणून लेखिका,अनुवादक मा.डॉ. रमा गर्गे उपस्थित होत्या. यावेळी वल्लरी प्रकाशनचे श्री व्यंकटेश कल्याणकर ह्यांची प्रमुख उपस्थिती होती.

काव्यसंग्रहावर भाष्य करताना मा.प्रविण दवणे म्हणाले मृणाल देशपांडे ह्यांच्या कवितेत बोरकरांसारखी जादू आहे. त्यांची कविता वाचकांना आंतर्मुख करते, मनाचा ठाव घेते असे. मृणाल ह्यांचे लेखन मराठी साहित्याच्या वैभवात भर घालणारे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. श्रीमती पूजा कावरे ह्यांनी सरस्वती स्तवन सादर केले. महेश अचींतलवार ह्यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले. गझलकार गिरीश जोशी ह्यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी सभागृहात सुप्रसिद्ध कवी प्रा.डॉ.दासू वैद्य, डॉ संदीप शिसोदे, प्रसिद्ध उद्योगपती अरुण देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश श्री शेटे सर डॉ. कुलकर्णी, कवयित्री रसिका देशमुख, प्रिया धारूरकर, रंजन कंधारकर, माधुरी चौधरी, कस्तुरी कुलकर्णी, संध्या फुलपगार,भास्कर निर्मळ पाटील, सुनील उबाळे, द्वारकानाथ जोशी इत्यादी साहित्यिक मान्यवरांसह नातलग, स्नेही आणि प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सिद्धार्थ




देशपांडे, मधुरा रोंगे, मिहिर देशपांडे, चिन्मयी देशपांडे, श्रेया राहुरी,चेतना भालेराव, माधवी राहुरी, क्षमा मोहिनी, इत्यादींनी परिश्रम घेतले.

## लक्षवेधी छायाचित्र....



हसणं असं दिलखुलास हवं। परिस्थिती कितीही ''भंगार'' असली तरीही...

(छाया : रतन राऊत, छ.संभाजीनगर )

# गंधारधून प्रस्तुत इश्क वाला लव्ह या प्रेमगीत व कविता मैफिलीचे थाटात प्रयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी अँम्फिथिएटर, अभिनव नगर, बोरीवली येथे गंधारधून प्रायोगिक कला मंचातर्फे इश्क वाला लव्ह या सदाबहार मराठी-हिंदी प्रेमगीत आणि कविता मैफिलीचा सोहळा जागतिक प्रेमदिननिमित्त मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गंधारधूनच्या प्रसिद्ध निवेदिका पल्लवी वढवेकर बर्वे आणि बहुश्रुत गायिका श्ृती पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

निसर्गाच्या अल्हाददायक वातावरणात धूसर हिवाळ्याच्या ऐन सांजवेळी सर्व सादरकर्त्यांनी प्रेक्षक, मान्यवर व पाहुण्यांच्या पसंतीस खिळवून ठेवणारा हा सोहळा रंगतदार घडवून आणला. गंधारधूनच्या सादरकर्त्या बहुश्रुत गायिका श्ृती पटवर्धन व मंगेश सर यांनी त्यांच्या सुरेल आणि मधुर आवाजात चित्रपट गीतांचे उत्तमरीत्या सादरीकरण केले. शारदा प्रकाशन ठाणे या संस्थेचे सर्वेसर्वा प्रा.डॉ. संतोष राणे सर यांनी मराठी साहित्यातील निवडक कविता सादर करून मैफिलीत वेगळाच साज भरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवीताईनी खेळीमेळीच्या वातावरणात रंजक पद्धतीने केले.



मैफिलीत कविता, गझल, मराठी-हिंदी सदाबहार चित्रपट गीतांच्या तालावर सादरकर्त्यांनी प्रेक्षकवर्गाची मने जिंकली. त्यांच्या उत्तम प्रतिसादात हा अभूतपूर्व असा सोहळा अनुभवण्याचा एक उत्कृष्ट योग आला.

कार्यक्रमात कवयित्री मा.स्वाती श्रृंगारपुरे, लेखक/ पत्रकार मा.प्रदीप बडदे , मा.प्रा.रोहिणी पाटील, लेखिका मा.प्रज्ञा पंडित व निवेदक मा.मनिष पंडित अशा दिग्गज मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून मैफिलीचा आस्वाद घेतला. अशा या नयनरम्य आणि देखण्या प्रयोगासाठी प्रेक्षकांनी पुढील इति स्त्री या महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाची आगाऊ नोंदणी देखील सुरू केली आहे हे गंधारधूनच्या मैफिलीचे सुयश म्हणावे लागेल.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



## आनंदी पहाट...


## सर्वांगीण विकासाचा दृष्टीकोन महत्वाचा

**ज्योतिर्मय साहित्य**

अनेक संस्थांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रत्येक क्षण विलक्षण कसा ठरेल, ह्याकडे भर दिला जात असल्याचे दिसून येते. संस्था परिसर आणि उपलब्ध सोई सुविधा, तेथील वातावरण ह्या सर्व बाबी निश्चितच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महत्वाच्या ठरतात. ह्या सर्वांचा अभ्यासपूर्ण विचार येथील संस्थांनी केल्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळत राहतो. पदोपदी नाविन्यपूर्ण अनुभवाची प्रचीती घेत घेत नवनवीन विलक्षण क्षण विद्यार्थांना त्यामुळेच प्रगतीपथावर घेऊन जातात. आज खरी गरज आहे योग्य करिअरच्या निवडीची, त्यायोगे चांगल्या नोकरी-व्यवसायाच्या आणि अर्थार्जनाच्या प्राप्तीची. आवड आणि निवड यांचा करिअरच्या दृष्टीकोनातून खूपच जवळचा संबंध असतो. तरीही केवळ आवड आहे म्हणून करिअरची निवड करणे उपयोगी ठरतेच असे नाही. करिअरची आणि शैक्षणिक संस्थेची निवड करताना आपल्याला मिळणारा आंनद, समाधान आणि स्थैर्य महत्वाचे असते. ह्या आनंदाला नोकरी मिळवण्याच्या प्रक्रियेत मुकावे लागणार नाही, दुख पदरांत पडणार नाही, नुकसान आणि मानसिक ताप होणार नाही हेही सतर्क राहून, डोळ्यांत तेल घालून बघण्याची जरुरी असते.

सद्य:स्थितीत अनेकवेळा साधेपणा म्हणजे भोळेपणा किंवा गबाळेपणा समजला जातो. अत्याधुनिकीकरणामुळे एकूणच आपल्या राहणीमानात बरेच बदल होत असतात. हे होणारे बदल एका अर्थी आपला विकासच घडवत असतात. आपले केवळ नीटनेटके राहणे हे पुरेसे नसून आपण चारचौघांमध्ये वेगळे आणि आकर्षक दिसणे आवश्यक झाले आहे. मुळातच सुंदर असणे आणि आकर्षक दिसणे या दोन्ही गोष्टी जरी सौंदर्याची अनुभूती देणाऱ्या असल्या तरीही केवळ सुंदर असणे सुद्धा पुरेसे नसून आकर्षक दिसणे आणि त्यासाठी नीटनेटके राहणे आवश्यक असते.

## धन्यवाद हो धन्यवाद...




**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

तसं तर जन्माला येताना आपण काही घेऊन येत नाही. आयुष्यभर सुखाच्या मागे लागताना पैसा, गाडी, बंगला यासाठी आपल्या आयुष्याचा मौल्यवान काळ आणि शक्ती खर्च करतो. पण जाताना सगळे इथेच ठेवून जातो. मग जे काही आपल्याला मिळाले ते त्याचीच कृपा नाही का ? आपल्याला ते ज्यांच्या कृपेमुळे मिळाले, ज्यांच्या मदतीशिवाय हे सगळे करणे अशक्य होते, त्यांचे आभार नको का मानायला ? कृतज्ञ राहणे म्हणजे स्वतःतला मी विलीन करणे. हे सगळे माझ्यामुळे नाही तर तुझ्यामुळे आहे ही भावना दृढ करणे. द्वैताकडून अद्वैताकडे जाणे. एखाद्या झाडाचे बी किती छोटे असते ! पण जोपर्यंत ते स्वतःला जमिनीत गाडून घेत नाही म्हणजेच स्वतःचा अहंकार विलीन करीत नाही तोपर्यंत त्याचे सुंदर वृक्षात रूपांतर होण्याची क्रिया होत नाही.





आपण व्यवहारात अनेक प्रकारचे निर्देशांक मोजत असतो. मग तो शेअर मार्केटचा असतो, महागाईचा असतो. भुतानसारखा छोटा देश आनंदाच्या निर्देशांकात ( इंडेक्स ऑफ हॅपिनेस ) भारतासारख्या विशाल देशाच्या कितीतरी पुढे आहे. हे जसे वेगवेगळे निर्देशांक आहेत तसेच कृतज्ञतेचा निर्देशांक मोजायला काय हरकत आहे ? एका ठिकाणी म्हटले आहे, ! आपण खरंच हा निर्देशांक मोजायची सवय लावली तर आपल्याला कळून येईल की आपण खरेच किती भाग्यवान आहोत. पण आपण नेहमी इतरांशी नको त्या गोष्टींची तुलना करून हा सहज मिळणारा आनंदही गमावून बसतो.

आपल्याला स्वतःबद्दल किती घमेंड असते पण साधे श्वास घेणे सुद्धा आपल्या हातात नसते. श्वास चालू आहेत ते त्याच्या कृपेने. केव्हा थांबतील याचा भरोसा नाही. जेव्हा श्वास घ्यायला त्रास होतो आणि दवाखान्यात भरती केले जाते तेव्हा आपल्याला श्वासांची किंमत कळते. एखाद्या अंध व्यक्तीच्या आयुष्याशी आपली तुलना केल्यावर डोळ्यांची किंमत कळते.

मग आपल्याला मिळालेले हे अख्खे शरीर त्या विधात्याने दिले हे त्याचे केवढे मोठे उपकार ! त्याचे मोल तरी करता येईल का ? पण त्याबद्दल आपण त्याचे किती वेळा धन्यवाद व्यक्त करतो ?

आपल्याला मिळालेले मित्र, नातेवाईक आपल्याशी असलेल्या कुठल्यातरी ऋणानुबंधाने आपल्याला मिळालेले असतात. त्यांच्यामुळे आपले जीवन सुकर झालेले असते. मित्र आणि नातेवाईक एवढेच नव्हे तर आपल्याला त्रास देणारे हितशत्रू, आपली कठीण काळी परीक्षा घेणारी संकटे या सगळ्या गोष्टी आपल्याला काहीतरी शिकवून जातात म्हणून यांच्याबद्दलही आपल्या मानत कृतज्ञतेची भावना असायला हवी. लहानपणापासून आजपर्यंत आपल्याला कोणी कोणी मदत केली याची जर आपण यादी करायला बसलो तर तर ही यादी खूप मोठी होईल. आता थोडेसे दुसऱ्या यादीकडेही वळू. ती म्हणजे आपण कोणाकोणाला किती उपयोगी पडलो, कोणाच्या आयुष्यात आपल्यामुळे आनंद, सुख आले ? अवघड वाटते ना ? ही यादी फार काही वाढत नाही असे दिसते. ही यादी जेव्हा पहिल्या यादीपेक्षा अधिक मोठी होईल, तेव्हा आयुष्याच्या मार्गावर आपली वाटचाल योग्य दिशेने सुरु आहे असे म्हणता येईल. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## कुविद्या लक्षणे

**ज्योतिर्मय साहित्य**


(मागील अंकावरून)

भित्रा गर्विष्ठ, विषयासक्त, व्यसनी, अती वाचाळ, खोट्या पराक्रमाच्या बाता मारणारा, अतीभ्रष्ट विचारांचा असतो. वाईट असुन विकाराधीन, खोटा असुन अनुपकारी स्वतः हीन पण दुसऱ्याचा अती तिरस्कार करणारा असतो. अल्पबुध्दीचा पण ऊगाचच वाद घालत बसणारा, टोचून बोलणारा, धुर्त, कपटी, वाईट शब्दाने दुसऱ्यास दुखावणारा, मनाला बोचेल असे बोलणारा अंगावर धाऊन येऊन बोलणारा, संशयाने बोलणारा, दुष्ट माणूस असतो. कुणाच्याही व्यंगावर बोलणारा, अशुभ बोलणारा, द्वेशाने बोलणारा, खोटे बोलणारा, क्षणोक्षणीबोलणे बदलणारा, मीच काय या जगात शहाणा आहे असा गैरसमज असणारा. कपटी,वाकड्या बुध्दीचा, आतल्या गाठीचा, क्षुद्र मनाचा, अंगचोर, द्वाड, रागीट, पापद्रव्य असलेला,अतिशय टवाळखोर असतो. तसेच सतत तापट,तामसी,अविचारी, पापी, फेफर्या, अंगात भुत समंधयांचा संचार होणारा असतो. अयोग्य वाईट तर्क करणारा, गायघातकी, ब्राह्मण घातकी, जन्मदात्या आई वडीलांचा घात करणारा, महापापी, मित्रद्रोही, विश्वास घातकी, क्रुतघ्न, परस्त्रीत रमणारा, नरकात जाणारा अतीयोग्य असतो.

संशयी, भांडणतंटा करणारा, कलहप्रिय,अधर्माने वागणारा, सदैव शोक करणारा, व्यसनी भेद करणारा, खोडकर अपयशी, घाणेरडा,लोकांना खोट्या भुलथापा देऊन गंडवणारा,कवडी चुंबक, लोचट, स्वार्थी, स्वैर वर्तनाचा,शिरजोर स्वभावाचा,

**(क्रमशः)**

## वृत्ति भगवंतमय होणे याचेच नाव भक्ति



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

भगवंतापासून पंचमहाभूते निर्माण झाली; आणि तसे बघितले तर सर्व चमत्कार भगवंताच्या सामर्थ्याने पंचमहाभूतांचेच असतात. भगवंताच्या ठिकाणी जे जे आहे ते ते सर्व आपल्या ठिकाणी आहे. भगवंत हा जगाचा मालक आहे. त्याच्या सत्तेने सर्व व्यवहार घडतात. आपण जीव त्याचा अंश आहोत. म्हणून आपण कर्तव्य करावे, आणि फळ भगवंताच्या इच्छेवर सोपवावे. आता प्रश्न असा आहे की, सर्व गोष्टी जर भगवंताच्या इच्छेने घडतात, तर माझी इच्छाही भगवंत उत्पन्न करतो; आणि असे आहे तर मी माझी इच्छा का मारावी ? अगदी बरोबर आहे. रात्री अंधार पडतो त्याला कारण कोण ? त्याला कारण सूर्य ! कारण सूर्य मावळला की अंधार पडतो. याचा अर्थ असा की, ज्याप्रमाणे प्रकाशाचे कारण सूर्य आहे त्याचप्रमाणे अंधाराचे कारण पण सूर्यच आहे; फरक इतकाच की, प्रकाशाचे कारण तो असणेपणाने आहे, आणि अंधाराचे कारण तो नसणेपणाने आहे. हे जसे खरे, तसे माझ्या इच्छेचे कारणसुद्धा भगवंतच आहे, पण नसणेपणाने कारण आहे इतकेच. सारांश, भगवंताचा विसर पडला की माझी इच्छा जन्म पावते. म्हणून, ज्याला भगवंत हवा असेल त्याने त्याचे स्मरण करावे आणि आपली इच्छा त्याला अर्पण करावी.

आपली देहबुद्धी नष्ट झाली की भगवंत ओळखता येतो. ज्याप्रमाणे इमारतीचा नकाशा कागदावर असतो, त्याचप्रमाणे सगुणमूर्ती हेच आपले परब्रह्म. एकदा नकाशा पक्का झाल्यावर मग इमारत बांधणे जड जात नाही. सगुणमूर्तीचे ध्यान करावे. ब्रह्म निराकार आहे, त्याला आकारात आणणे ही चूक आहे, असे कुणी कुणी म्हणतात, पण मी स्वतः जोपर्यंत आकारात आहे तोपर्यंत सगुणमूर्तीचे पूजन आवश्यकच आहे. मी रामाचा आहे असे म्हणणे म्हणजे मी ब्रह्म आहे असे म्हणणे होय. तदाकार वृत्ती होणे याचे नाव अनुसंधान; आणि अनुसंधानाने वृत्ती भगवंतमय होणे याचे नाव भक्ति. ब्रह्म सत्य जग मिथ्या याचा थोडक्यात अर्थ म्हणजे; जग जसे आहे असे आपण समजतो तसे ते नाही. अंतर्बाह्य परमात्मा दिसू लागणे हेच भक्तीचे लक्षण आहे.


याकरिता, आपल्या कृतीकडे भगवंत पाहतो ही जाणीव नेहमी कायम ठेवावी. भगवंतापासून मी दूर आहे ही भावनाच मनात आणू नये. भगवंताच्या प्राप्तीकरता देहाचा सांभाळ करावा. मन रामाकडे गुंतलेले असले म्हणजे देहाचा विसर पडतो. म्हणून नामस्मरणाच्या योगाने मन भगवंताच्या ठिकाणी विलीन करावे. हेच परमार्थाचे सर्व सार आहे.

वेदांती ज्याला ब्रह्म असे म्हणतात, त्यालाच भक्त नाम असे म्हणतात.

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७



## माझा डोळसपणा

**ज्योतिर्मय साहित्य**

तशी मी लहापणापासून फारच डोळसपणे वावरते.(माझाच स्वतः बद्दलचा गोड गैरसमज) तर एकदा (असे बरेच एकदाचे किस्से आहेत) मी रस्त्याने चालले होते. फार नम्रतेने चालायची सवय होती. म्हणजे हनुवटी अगदी खाली म्हणजे फ्रॉकच्या बॉर्डरला टेकवून चालणे. अनेकदा सर्वांनी सांगितले होते समोर बघून चालत जा. पण ऐकते कोण? तर मी निघाले आणि एकदम थांबलेच. कारण रस्ता बंद! रोजचा रस्ता बंद कसा? म्हणून वर बघितले तर एका बैलगाडी खाली शिरले होते. मग काय कुठे कसे पळावे ते पण कळेना. कसे बसे लोकांनी बाहेर काढले आणि तेव्हा पासून समोर बघून चालायची सवय लागली. आणि डोळे उघडले!

अशीच अजून एक सवय होती.ती म्हणजे दोन पायावर सरळ चालायचेच नाही. एक पाय समोर उडवत मागच्या पायावर उड्या मारत चालायचे.आणि रस्ता न बघता मजेत चालायचे. या साठी पण खूप ओरडा मिळायचा.पण जेव्हा ही ‘‘तगडक तगडक‘‘ चालणारी स्वारी दगडाला ठेचकाळून आपटली आणि दोन्ही गुडघे फोडून घेऊन चार दिवस घरात बसली तेव्हा *डोळे उघडले.

असाच अजून एक प्रसंग! आजीने सांगितले दुकानातून फुले व तुळस घेऊन ये. हातात पैसे घेऊन निघाले. फुलाच्या दुकानातून फुले घेतली.आणि खूप दुकाने शोधून घरी आले. उशिरा आल्या बद्दल घरचे ओरडले आणि उशिराने कारण विचारले. मी सांगितले, ‘‘खूप दुकाने फिरले. तुळस कुठेच मिळेना म्हणून उशीर झाला‘‘. तेव्हा कुठे कुठे व कोणत्या दुकानात शोधले असे मोठ्या माणसांनी विचारले. मग काय मोठ्या फुशारकीने फिरलेल्या दुकानांची नावे सांगितली.असे वाटले आता घरचे किती फिरली म्हणून कौतुक करतील. तर सगळे जण जोरात हसू लागले. मी कावरी बावरी. काय चुकले तेच कळेना.मग आजी म्हणाली, ‘‘अगं, वाण्याच्या दुकानात कोणी तुळस शोधते का? ती तर फुलाच्या दुकानात मिळते‘‘. हे अज्ञान उघडे पडले आणि डोळे उघडले!

तर योग्य ठिकाणी डोळ्यांचा वापर न केल्याची गंमत! आणि स्वतःचे डोळे स्वतःच उघडून घेण्याची सवय! असो आता फार नको. नाहीतर परत डोळे उघडायचे आणि लिहिणे बंद व्हायचे.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर


**ज्योतिर्मय साहित्य**

**प्राणघातान्निवृत्तिः परधनहरणे संयमः सत्यवाक्यं**
**काले शक्त्या प्रदानं युवतिजनकथामूकभावः परेशाम्।**
**तृष्णास्रोतोविभङ्गो गुरूषु च विनयः सर्वभूतानुकम्पा**
**सामान्यः सर्वशास्त्रेश्वनुपहतविधिः श्रेयसामेश पन्थाः ।।**

अर्थ – प्राण्यांवर आघात करण्यापासून निवृत्ती, परक्याचे धन हरण करण्यात संयम, सत्य वचन, वेळोवेळी यथाशक्य दान, परस्त्री विषयक चर्चेत सहभागी न होणे, तृष्णेचे स्रोत असे जे विषय त्यापासून दूर राहणे, ज्येष्ठांच्या प्रती विनय, सर्व जीवांचे ठायी करुणा हे शास्त्रविहित आणि सर्वमान्य असे कल्याणाचे मार्ग आहेत.

शास्त्रविहित कल्याणाचे मार्ग कोणते, या विषयीची चर्चा या श्लोकात करण्यात आली आहे. कवी म्हणतात की, सर्व भूतांप्रति दया, अस्तेय, सत्य, दान, विनय, करुणा हे कल्याणाचे मार्ग आहेत.

## आचरणात आणावे असे



**ज्योतिर्मय साहित्य**

सकाळ म्हणजे फक्त सुर्योदय नसते ती एक देवाची सुंदर कलाकृती असते तो अंधारावर मिळवलेला विजय असतो आणि जगावर पसरलेल्या प्रकाशाच्या साम्राज्याची साक्ष असते आणि आपल्या आयुष्यातल्या नव्या दिवसाची आणि ध्येयाची सुरुवात असते आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा फायदा घ्यावा पण कुणाच्या परिस्थीचा किंवा विश्वासाचा नाही... आयुष्याच्या वाटेवर एका चुकीमुळे साथ सोडणारे भरपूर असतात. पण ती चूक समजावून सांगून, आयुष्यभर साथ देणारे लाखात एक असतात.

चांगल्या गोष्टी घडत नसतात, त्या घडवाव्या लागतात त्यासाठी योग्य वेळी योग्य ते निर्णय घ्यावे लागतात, केलेले उपकार, दिलेला शब्द आणि उपयोगी पडलेली ‘‘माणसं‘‘ कधीही विसरायची नसतात. जीवनातील सर्वात मोठ अंतर म्हणजे एका मनापासून दुसऱ्या मनापर्यंत पोहोचणं आहे आणि यालाच सर्वात जास्त वेळ लागतो. लोकांमध्ये चांगुलपणा आणि वाईटपणा दोन्ही असतात आपण काय शोधायचं हे महत्त्वाचं आहे. विष आणि शब्द एकाच ताकदीचे आहेत विषाचा एक थेंब शरीरात शिरला की जीवन संपवतो. आणि गैरसमजुतीचा एक शब्द कानात शिरला की भली भली नाती संपवतो




## चहा जास्त उकळल्याने होऊ शकते ही गंभीर समस्या

**ज्योतिर्मय साहित्य**

चहा सगळ्यांनाच आवडतो. क्वचितच असं कुणी असतं जे चहा घेत नाहीत. खासकरून थंडीच्या दिवसात लोक चहाचं जास्त सेवन करतात. चहाशिवाय त्यांच्या दिवसाची सुरूवातच होऊ शकत नाही. असं म्हणतात की, थंडीच्या दिवसात एक कप चहाने तुमच्या अनेक समस्या दूर होतात. चहाला थंडीच्या दिवसात बेस्ट इम्यूनिटी बूस्टर मानलं जातं. पण जर तुम्हाला सांगितलं की, थंडीच्या दिवसात जास्त चहा पिणं टाळलं पाहिजे तर तुम्ही असं कराल का?

हिवाळ्यात चहाचं सेवन खूप जास्त होतं. भलेही याचे काही फायदे होत असतील, पण याचं प्रमाणापेक्षा जास्त सेवन करणं आरोग्यासाठी नुकसानकारक ठरतं. चला जाणून घेऊ हिवाळ्यात चहाचं सेवन कमी का करावं.

**जास्त उकळू नका**

थंडीच्या दिवसात आल्याचा चहा मिळाला तर मन शांत होतं. हा चहा घेतल्याने सर्दी-खोकल्यापासून आराम मिळतो. तसेच हिवाळ्यात पुन्हा पुन्हा लघवीला जाण्याची समस्याही दूर होते. पण, डॉ. पांडे यांनी आल्याचा चहा न पिण्याचा सल्ला दिला आहे.



त्या सांगतात की, आपण चहामध्ये आलं, लवंग, वेलची टाकून बराच वेळ उकडतो. प्रयत्न करा की, चहा जास्त वेळ उकडू नका. कारण यामुळे चहामधील टॅनिन बाहेर येतं. जे ॲसिडिटीचं मोठं कारण बनतं.

**काय असतं टॅनिन?**

टॅनिन एकप्रकारचं अँटी-ऑक्सिडेंट आहे.


संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९


जे चहा पावडरमध्ये आढळतं. जेव्हा टॅनिन जास्त प्रमाणात घेतलं जातं तेव्हा ॲसिड रिफ्लक्स आणि गॅस तयार होतो. जर चहा घेतल्यावर गॅस जास्त वेळापर्यंत बनत असेल तर पोटात सूज येऊ शकते. त्यामुळे ज्यांना आतड्यासंबंधी समस्या आहे त्यांनी चहाचं सेवन कमी करावं. इतकंच नाही तर जर पोटात इन्फेक्शन असेल तर चहाचं सेवन पूर्णपणे बंद करावं.

**दिवसातून किती चहा प्यावा**

एक्सपर्टनुसार, दिवसातून दोन किंवा तीनपेक्षा जास्त वेळा चहा घेऊ नये. हिवाळ्यात चहाचं सेवन दोन वेळा करणंच चांगलं ठरू शकतं. यात तुम्ही हवं ते मिक्स करून पिऊ शकता. यापेक्षा जास्त वेळा चहा पिणं नुकसानकारक ठरू शकतं. खरं तर बाजारात मिळणारा चहा पिणे टाळणेच योग्य. वेगवेगळे काढे चहा म्हणून पिणे उत्तम.

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

आपल्या साहित्यात त्यांनी बंगाली बोलीभाषेचा वापर करायला सुरुवात केली त्यांच्या या लेखनावर अशुद्ध बोलीभाषेतील लेखन म्हणून तत्कालीन विद्वानांनी टीका केली. कळस म्हणजे एकदा तर रवींद्रनाथांच्या साहित्यातील उतारा एका विद्यापीठातील परीक्षेला हा उतारा शुद्ध करून लिहा म्हणूनही टाकला गेला होता. म्हणून रवींद्रनाथ म्हणतात की भारतीय विद्यापीठे म्हणजे केवळ पदव्या वाटणारे कारखाने आहेत. आजही इतक्या वर्षानंतर या वस्तुस्थितीमध्ये फारसा फरक पडलेला नाही. अशा विद्यापीठांमध्ये विद्यादानापेक्षा पदवीदानालाच जास्त महत्त्व दिले जाते. आणि अशा विद्यापीठातून विद्यार्थी जेव्हा पदवी घेऊन बाहेर पडतो तेव्हा आपल्याला सर्व काही येते अशा प्रकारच्या भ्रमात तो असतो.

रवींद्रनाथांच्या वागण्या बोलण्याचा प्रभाव मात्र तत्कालीन अनेक लोकांवर पडला होता. अनेक विद्वान त्यांचे मित्र होते. त्यांच्या कार्यपद्धतीने भारावून जाऊन त्यांच्या कार्याला वाहून घेतलेले अनेक लोक स्वयंस्फूर्तीने शांतीनकेतनमध्ये सेवा देण्यासाठी आले होते. ही सगळी मंडळी अत्यंत समर्पित भावनेने काम करणारी होती. अत्यंत कमी मानधनामध्ये ते हे काम करीत असत. अशा लोकांमध्ये ब्रह्मबांधव उपाध्याय यांच्यासारखे विद्वान होते. या उपाध्याय यांनीच रवींद्रनाथ यांना प्रथम गुरुदेव असे संबोधले. आणि नंतर रवींद्रनाथ गुरुदेव या उपाधीने ओळखले जाऊ लागले. त्याचप्रमाणे त्यांच्यासोबत कालीमोहन घोष, जगदानंद, नेपाळचंद्र राय हे सहकारी शिक्षक होते. अभिजात संगीत शिकवण्यासाठी भीमराव शास्त्री हे महाराष्ट्रातून तिथे गेले होते. विधुशेखर शास्त्री हे संस्कृत पंडित यांच्यासारखी प्रचंड गुणी माणसे रवींद्रनाथांनी जोडली होती. या सगळ्यांना आणि आपल्या विद्यार्थ्यांना गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी उत्तमोत्तम साहित्य लिहिण्याची, संशोधन करण्याची, चित्रनिर्मितीची, नवनिर्मितीची प्रेरणा दिली. त्यांच्यामध्ये मनुष्यधर्माची जागृती निर्माण केली. निसर्गाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी दिली आणि विकासाच्या अनेक वाटा त्यांच्यासाठी मोकळ्या करून दिल्या.

महात्मा गांधी, लोकमान्य टिळक आणि इतर काही महत्वाच्या नेत्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन लोकांना केले होते. त्याची सुरुवात बंगालमध्येच कलकत्याच्या टाऊन हॉलमध्ये ऑगस्ट १९०५ मध्ये अधिकृतपणे झाली. बंगालच्या फाळणीला लोकांचा विरोध होता. हा विरोध लोकांनी वंदे मातरम गाऊन व्यक्त केला. एकतेचा निर्धार केला. या प्रसंगी रवींद्रनाथांनी आमार शोनार बांगला या गीताची रचना केली. पुढे हे गीत बांगला देशाचे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारण्यात आले. यावेळी उपस्थितांनी विदेशातून आलेले कापड वापरायचे नाही असा निर्धार केला.

क्रमशः)

# आचरणात आणण्यासारखे खूप काही

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

त्यामुळे, ''गेले ते दिन गेले'' असं म्हणण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. आता तर, एकविसाव्या शतकाच्या तिस-या दशकात तर दहा, पंधरा आणि पंचवीस मजली इमारतीत माणसें समोरासमोर राहात असूनसुद्धा त्रयस्थ माणसांसारखे वागत राहात आहेत. कुणाचे कुणाशी संवाद होत नसतात. मग, देणंघेणं तर दूरंच राहिलं. सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमा निमित्ताने एकत्र आले तरच, थोडेफार बोलणे होते. अशी शहरातील माणसांची स्थिती आहे. तसेच, हीच त्यांची नीती आणि जीवनपध्दती झाली आहे. आजच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शैक्षणिक क्षेत्रात आणि मनोरंजनाच्या क्षेत्रात संगणकीय अत्याधुनिक प्रणालीचा वापर लहान मुलांपासून, युवक युवती मोठी माणसे तसेच, वृध्द माणसेही करीत आहेत. ही चांगली बाब आहे.पण, मुख्य मुद्दा हा आहे मोबाईल, टी.व्ही यांचा वापर शैक्षणिक , वैज्ञानिक माहिती मिळविण्यापेक्षा दिवसभर करमणूक आणि मनोरंजनाचे साधन म्हणून जास्त प्रमाणात होत चालला आहे. व्हिडिओ गेम्स खेळणे, कार्टून शो पाहणे यातच लहान मुलांचा खूप वाया चालला आहे. त्या कारणास्तव ती एककल्ली आणि हट्टी होत चालली आहेत. घरातील पालकमंडळी व्यवसाय, नोकरी निमित्ताने बाहेर जात असतात. संध्याकाळी घरी आल्यावरही ते

लॅपटॉपमध्ये किंवा मोबाईलवर व्यस्त असतात.

त्यामुळे, मुलांकडेही लक्ष द्यायला त्यांना वेळ नसतो किंवा ते लक्ष देत नाहीत. समाजातील कुटुंबातील माणसांची आजची अशी परिस्थिती आहे की, संपुर्ण कुटुंब आज मोबाईलमध्ये व्यस्त आहे. त्यातच मग्न आहे. त्यामुळे, कोणालाही कोणाकडे लक्ष द्यायला वेळ नाही.

विशेषत: लहान मुलांमुलींकडे लक्ष देणे आवश्यक असताना पालकचं मोबाईलमध्ये व्यस्त असल्याने लक्ष कोण देणार! अशी बहुतांशी कुटुंबातील जीवनाची स्थिती आहे.

मग, वृध्द माणसांच्या, लहान मुलांमुलींच्या मनांची जपणुक करण्याची बाब तर बाजूलाच आहे. कौटुंबिक, सामाजिक जाणिवेतून त्याकडेतर कोणाचेच लक्ष नाही आहे. याचा फार गंभीर परिणाम कौटुंबिक व सामाजिक जीवनावर होत आहे. कौटुंबिक व सामाजिक जीवन अस्थिर होत आहे. त्यामुळे, सामाजिक संतुलन

डळमळीत होतो आहे. याला कारणीभूत भितीदायक व गुन्हेगारी प्रवृत्तीचे व्हिडिओ गेम्स आहेत. जे काही परदेशी कंपन्या व काही भारतीय कंपन्या विनामुल्य प्रसारित करीत आहेत. सहा वर्षांपासून ते वय वर्षे सोळा पर्यंतची लहान मुले अशा व्हिडिओ गेम्सकडे आकर्षित होऊन दिवसरात्र त्यातच मग्न राहात आहेत. असे चित्र जागतिक सर्वेक्षणानुसार निदर्शनास आले आहे. महाराष्ट्रात काही शहरात अशा व्हिडिओ गेम्समुळे मानसिक संतुलन बिघडल्याने काही बालकांनी इमारतींवरुन उडी मारुन तसेच, काहींनी गळफास घेवून आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबतच्या बातम्या दैनंदिन वर्तमानपत्रातून प्रकाशित होत असतात. त्यामुळे, या घडलेल्या घटनांकडे व पुढील काळात अशा घटना पून्हा भविष्यात घडू नयेत. यासाठी, कौटुंबिक स्तरावर, शालेय स्तरावर, राज्यशासन स्तरावर व सामाजिक स्तरावर अत्यंत गांभीर्याने लक्ष अत्यावश्यक आहे. तसेच, त्यावर ठोस उपाययोजना करुन अशा न घडण्यासाठी सामाजिक प्रबोधन सर्व स्तरांवर होणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

मधुकर ए.निलेगावकर,
पुणे
९४२१३७५६९१

विज्ञानाच्या प्रगतीमुळे अत्याधुनिक साधने, तंत्रज्ञान तर निघणारच आहे. त्यात वरचेवर अधिकाधिक सुधारणा तर होतच राहणार आहेत. तसेच, वापर करणेही आवश्यक आहेच. फक्त कोणत्या साधनांचा, तंत्रज्ञानाच्या आधारे कोणी किती वापर करायचा आणि कसा करायचा व कोणत्या वेळेत करायचा हे ठरविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यावरच, लहानांपासून मोठ्यांपर्यंतच्या माणसांची जीवनाची



दिशा ठरणार आहे. कोणत्याही गोष्टीला बंधन हे हवेच! तरच, त्या वस्तूचे महत्त्व राहते. तसेच, माणसाचे जीवनही सुखकर होते. म्हणून, पूर्वापार चालत आलेल्या

जून्या म्हणुनही बोधप्रद आहेत. त्यातीलच एक म्हण आहे. ''अति तेथे माती'' असे व्हायला नको आहे. सर्वांना संस्कारयुक्त वळण असणे आवश्यक आहे. जगातील इतर देशांतील संस्कार व संस्कृत्या नष्ट झाल्या.पण, भारतातील हिंदूसंस्कृती लाखो वर्षांपासून आजही टिकून आहे. याचे कारण,या देशात भगवान श्रीकृष्ण व भगवान श्रीरामांच्या जन्मावताराचे त्यांच्या सत्यधर्मांचे अधिष्ठान आहे. मुख्य म्हणजे ही हिंदूसंस्कृती म्हणजेच भारतीय संस्कृती पूढेही हजारो शतके टिकून राहिली पाहिजे. प्रत्येक हिंदूस्थानी म्हणजेच, भारतीय नागरिकाने आपल्या कौटुंबिक स्तरावर,गावस्तरावर, जिल्हास्तरावर, राज्यस्तरावर आणि देशस्तरावर शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, संगणकीय,आरोग्य, पर्यावरण, निसर्गसंरक्षण इत्यादी क्षेत्रात अत्यंत निष्ठेने सर्व

दृष्टीने परिपूर्ण असे सर्वंकष अत्यंत उत्कृष्ट कार्य केले पाहिजे. व भारताचा नावलौकिक जगात हजारो शतकापर्यंत टिकून राहील असे उत्कृष्ट कार्य केले पाहिजे. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची संस्कृती महान आहे. अभेद्य आहे. कारण भारत देशावर शेकडो आक्रमणे झाली. तरी, हजारो वर्षांपासून भारतीय हिंदूसंस्कृती अजूनही अभेद्य टिकून आहे. जय हिंद!जय महाराष्ट्र!

# ''एक हात मदतीचा''.... माणुसकीचा प्रकाश महापारेषणच्या लेकीसाठी मदतीचा हात...

**ज्योतिर्मय साहित्य**

आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला कुटुंबाचा आधार हवा असतो. जन्माने मिळालेले कुटुंब असतेच, पण कार्यस्थळी मिळालेल्या आपल्या सहकाऱ्यांचे प्रेमही काही कमी नसते. महापारेषणच्या या कुटुंबाने आज एक असामान्य कर्तव्य निभावले एका लेकीसाठी महापारेषण कार्यालय छत्रपती संभाजी नगर माहेरची मायेची सावली बनले. मयुरी दांडगे एक बाह्य स्त्रोत कर्मचारी आणि कर्तव्यनिष्ठ मुलगी छत्रपती संभाजीनगर परिमंडळातील अतिउच्च दाब संचलन व सुव्यवस्था या तांत्रिक विभागात गेली पाच वर्षे बाह्य स्त्रोत कर्मचारी म्हणून आपली सेवा बजावत आहे.

मयुरी दांडगे हिने आपल्या मेहनतीमुळे, निष्ठेमुळे इथल्या प्रत्येक सहकाऱ्यांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. परंतु या लेकीचे वडिलांचे छत्र तिच्या बालपणीच हरवले



आहे आणि घरची परिस्थितीही खूपच बिकट आहे. आई मोलमजुरी करते, घरात एक लहान बहिण व एक लहान भाऊ, अशा परिस्थितीत तिच्या लग्नाच्या या मंगल क्षणी, तिला आधार देण्याची संधी आपल्या महापारेषण कुटुंबाला मिळाली.

''आपलेपणाचा हा हात'' याच संवेदनशीलतेतून, आपल्या काही सहकाऱ्यांनी पुढाकार घेतला आणि मयुरीच्या नव्या संसाराच्या पाया भरणीसाठी मदतीचा एक हात पुढे केला. एकेक जण येत राहिले, हात हातात मिळत राहिले, आणि काही तासांतच या मदतीने ५० हजार १०० रुपये म्हणून मोठे रूप घेतले. ही केवळ आर्थिक मदत नाही, तर मायेची ऊब आहे, सहवासाची उब आहे, आणि आपलेपणाची अनमोल भेट आहे. (क्रमशः )



(सीमा गाडेकर)
उपकार्यकारी अभियंता,
महापारेषण, छत्रपती संभाजीनगर

# बहिष्कृतांचे अंतरंग


**ज्योतिर्मय साहित्य**

बहिष्कृतांचे अंतरंग हे विलास वरे सरांचे पुस्तक हातात पडले तेंव्हा पुस्तकांच्या मुखपृष्ठानेच लक्ष वेधून घेतले. भोवताली काटेरी कुंपण, ती मुकी झालेली काळोखी मानवी परछाया, हृदयीचे तेज व्यंग झालेल्या हाताने दाबते आहे. बरंच काही सांगायचे आहे पण भावनाच बोथट झाली आहे.या पुस्तकामध्ये हेटाळणी, उपेक्षा, वेदना, दिलेल्या लोकांची कहाणी असेल असे वाटून गेले. पण विलास वरे सरांनी लिहिलेल्या एकेक वास्तव कथा वाचताना अंतरंग ढवळून निघाले. वैद्यकीय क्षेत्रात कुष्ठरोगावर कुष्ठरोग्यांसाठी काम करणारे वरे सर व्यवसायाने नुसते एक डॉक्टर नसून ते माया, ममता, त्याग, समर्पण, संवेदनशीलता, सोशिकतेचा जिवंत झरा आहेत . कुष्ठरोगांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी आपल्या सर्व सुखाचा त्याग केला. या त्यांच्या कार्यामध्ये त्यांची धर्मपत्नी सुनीता ताईचीही मोलाची साथ मिळाली.

स्वार्थाने बरबटलेल्या दुनियेत, स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याचं हिसकावून घेणारी माणसं आपण पाहतच असतो. तशीच आपल्याच रक्तामासाच्या नातेवाईकांनी घरातील एखाद्याला कुष्ठरोग झाला म्हणून टाकाऊ वस्तुसारखे उघड्यावर टाकले. ज्यांनी कुटुंबासाठी खूप काही सोसले भोगले पण एका रोगाची लागण होते आणि त्यांचे महत्त्व संपते.अशा मानवी नात्यांना काय म्हणावे? असा प्रश्न हे कथानक वाचताना अनेकदा मनात येऊन गेला.पण त्यांची सावली, आधार, मनीचा गारवा होण्याचे काम वरे सर व त्यांच्या पत्नीने केले.

कुष्ठरोग निर्मूलनासाठी जागोजागी जनजागृती आणि कुष्ठरोग्याचा शोध घेऊन रोगी सापडलाच तर गोपनीयता ठेवून, योग्य वेळी औषधोपचार करून, त्याला मानसिक आणि शारीरिक आधार देणारे, समाजाकडून कुटुंबाकडून हवहेलना, अपमान,हलाखीचे जीवन जगणाऱ्या अनेक कुष्ठरोग्यांना माणुसकीचा हात देऊन नव्याने उभे करणारे सर एका देवदूतासारखे वाटले. कथासंग्रहामध्ये एकूण सत्तावीस कथा आहेत. प्रत्येक कथेत एक वेगळं वास्तव मांडलेल आहे.

पहिले पुनर्वसन या कथेतील तहान भागवण्यासाठी पाण्याला केलेला स्पर्श एवढ्या शुल्लक कारणासाठी हॉटेल मालकाची कुष्ठरोग झालेल्या मुलाला केलेली बेदम





मारहाण वरे सरांच्या मनाला चटका लावून गेली. प्रत्येक कुष्ठरोग्यांच्या बाबतीत त्यांना असेच अनुभव येत होते.या समाज व्यवस्थेच्या डोक्यातून कुष्ठरोग्याच्या सहवासातून, स्पर्शातून रोगाची लागण होत नाही हे त्यांनी किती वेळा त्यांनी पटवून दिले. पण त्याना त्याचाकडून हवा तसा प्रतिसाद कुटुंबाकडून, समाजाकडून मिळाला नाही.

एका परप्रांतीय मुलाला आई-वडिलांनी हाकलून दिले पण वरे सरांच्या कुटुंबीयांनी त्याला जगण्याचे बळ दिले. काही काळ का असेना आई-वडिलांची माया दिली. त्याचप्रमाणे कथेतील माधव, हरिबा, विठूचा विठ्ठलशेठ झाला अशा कित्येक कुष्ठरोग्याचे त्यांनी स्वखर्चाने प्रसंगी आपल्या इच्छांना मुरड घालून त्यांचे पुनर्वसन केले. त्यांना नव्याने स्वाभिमानाने जगण्यासाठी मार्ग दाखवले. एका स्तरातील किंवा एका व्यवसायातील कुष्ठरोगी त्यांना कधीच भेटले नाहीत. प्रत्येकाची पार्श्वभूमी वेगळी होती. व्यवसाय,भाषा, प्रांत, वय वेगवेगळे होते. दुःखाच्या वेदनाही प्रत्येकांच्या वेगळ्या होत्या. पण वरे सरांनी त्या प्रत्येक वेदनांची फुले करण्याचा प्रयत्न केला. समाजात त्यांना पूर्वीप्रमाणे स्थान प्राप्त करून देण्यासाठी अहोरात्र कष्ट उपसले. पण उपकार किंवा परतीची भाव कधीच ठेवलला नाही. हे कार्य त्यांनी कुष्ठरोग्यांची सेवा हीच ईश्वर सेवा म्हणून केले.


अखेर नानीनं मरण स्वीकारलं, मरणखुणाची जन्मकथा, विकृत हातानी साकारली हिरवाई या कथा मनाला चटका लावून गेल्या. संवेदनाहीन वृत्ती प्रकर्षाने जाणवली.

एक अनोखा कलावंत, माझ्या सवे पांडुरंग नाचला, सोंगाड्या रडू लागतो तेव्हा या कथातून वरे सरांच्यातील एक साहित्यिक,कलावंत जागा होतो. त्यांना आयुष्य पुन्हा नव्याने सुरू करण्यासाठी ते प्रेरणा देतात. त्यांच्या कुटुंबाचा भार स्वतःच्या खांद्यावर घेतात. अल्पशा असणाऱ्या पगारात किती मोठे दातृत्व असे कित्येकदा वाचताना वाटून गेले. प्रत्येक कथेतील परमेश्वर रुपी नायक वरे सर अनेकदा मनाला स्पर्शून गेले. जीवनाकडे आणि जगण्याकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून गेला.

यशवंतरावजींची अविस्मरणीय भेट, परिस भेटला स्पर्श राहून गेला. या दोन कथातून माझी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे अनमोल विचार व कार्य कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाबद्दल त्यांचा अभ्यास किती दांडगा होता याची जाणीव झाली. पु.ल. देशपांडे यांचा त्यांना लाभलेला सहवास. डोंगरा एवढे कार्य असूनही आपुलकी,जिव्हाळा,साधेपणा मनाला खूप भावला. पण वरे सरांच्या पुस्तकाला त्यांचा परिस स्पर्श राहून गेला ही खंत राहिली. अलगद ओंजळीतले क्षण निसटून जावेत असंच काहीसं वाटलं.

बहिष्कृतांचे अंतरंग या कथासंग्रहात एक मोलाचा संदेश आहे. मी तुम्हाला कठीण प्रसंगी मदतीचा हात दिला तसा तुम्हीही वंचिताना, दुःखीताना द्या. त्यांना नव्याने उभा करण्याचे चांगले कार्य करत रहा. हे पुस्तक प्रगल्भ लेखणी असणारे, वाचनीय आणि माणुसकी शिकवणारे प्रत्येकाच्या संग्रही असावे असेच आहे. प्रख्यात लेखक, आदरणीय विलास वरे सरांच्या कार्याला सलाम व पुढील लेखन कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा.

पुस्तकाचे नावं - बहिष्कृतांचे अंतरंग
लेखक -मा. विलास वरे
पृष्ठ संख्या -३८८
मूल्य -५००रू



# निस्वार्थी, निष्कलंक आणि रयतेसाठी लढणारे इतिसातील एकमेव राजे : छत्रपती शिवाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या शौर्यचे प्रतीक आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीसाठी छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक नाव नसून शौर्य, समता, प्रेरणा आणि आस्थेचे केंद्र आहे. स्वराज्य स्थापनेपासून आजपर्यंत महाराष्ट्राचे राजकारण आणि सत्ता हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावानेच सुरू असलेले पाहायला मिळते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांच्या आई जिजाबाईनी त्यांना लहानपणापासूनच धर्म, नैतिकता, शौर्य आणि स्वाभिमानाची मूल्ये दिली. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्यांनी स्वतंत्र स्वराज्याचा पाया घातला आणि आपल्या अद्वितीय नेतृत्वाने तो प्रत्यक्षात आणला. ते केवळ एक शूर योद्धा नव्हते तर एक दूरदर्शी शासक, संघटक आणि समाजसुधारक देखील होते.

शिवनेरी गडावरील शिवाई देवीच्या नावावरून त्यांचे नाव शिवाजी ठेवले. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला जिजाबाईनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा अशी प्रार्थना केली होती म्हणून या मुलाचे नाव 'शिवाजी' ठेवले गेले. शिवरायांचे वडील शहाजीराजे भोंसले हे मराठा सेनापती होते, ज्यांनी दख्खनच्या सल्तनतची सेवा केली होती. त्यांच्या आई जिजाबाई होत्या, ज्या सिंदखेडच्या लखुजी जाधवांच्या कन्या होत्या. जाधव हे देवगिरीच्या यादव राजघराण्यातील वंशाचे होते.

शिवाजी महाराजांचे वडील शहाजी आणि आई जिजाबाई होते. आई जिजाबाई, स्वभावाने धार्मिक असूनही, तिच्या गुणांनी, स्वभावाने आणि वागण्यात एक धाडसी महिला होत्या. त्यांनी बाळ शिवाला रामायण, महाभारत आणि इतर भारतीय नायकांच्या



गौरवशाली कथा सांगून आणि शिक्षण देऊन वाढवले. छत्रपती शिवाजी महाराजांचा विवाह १४ मे १६४० रोजी सईबाई निंबाळकर यांच्याशी झाला. त्यांच्या मुलाचे नाव संभाजी होते. संभाजी हे शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र आणि उत्तराधिकारी होते ज्यांनी १६८० ते १६८९ पर्यंत राज्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांना अजूनही एक शूर योद्धा, नवीन लष्करी रणनीती वापरणारे चतुर रणनीतीकार आणि एक कुशल प्रशासक म्हणून ओळखले जाते. लहानपणी तो महाभारत आणि रामायणाच्या गौरवशाली गाथा वाचत असे.

आदिलशाही, निजामशाही आणि मुघल सत्ता यांच्या विरोधात शिवरायांना लढावे लागणार होते. स्वराज्य निर्मितीची मुहूर्तमेढ म्हणून त्यांनी किल्ले तोरणा वयाच्या १५ व्या वर्षी जिंकला. त्यांनतर स्वराज्यावर आलेल्या प्रत्येक संकटाला अत्यंत धैर्याने तोंड देण्यात महाराज यशस्वी ठरले. यानंतर त्यांनी अनेक किल्ले जिंकले आणि स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण केले. ''जय भवानी, जय शिवाजी!'' हे केवळ युद्धातील घोषवाक्य नव्हते, तर स्वराज्याच्या ध्येयाची ओळख होती.


छत्रपती शिवाजी महाराज ह्यांचे पहिले लग्न बालपणीच १६४० रोजी पुण्यातील लाल महालात मोठ्या थाटाने फलटणच्या निंबाळकर घराण्यातील सईबाई निंबाळकर ह्यांच्याशी झाले. सईबाई फलटणच्या मुधोजीराजे निंबाळकर ह्यांचा कन्या होत्या. सईबाईना संभाजी राजे पुत्र म्हणून लाभले. छत्रपती शिवाजी महाराज ह्याचे दुसरे लग्न वर्ष १६४१ रोजी शिर्के घराण्यातील सगुणाबाई शिर्के ह्यांच्याशी झाले. सगुणाबाई ह्यांना राजकुवरबाई नावाच्या कन्यारत्न होत्या. छत्रपती शिवाजी महाराज ह्यांचे तिसरे लग्न १६५० मध्ये मराठा साम्राज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते ह्यांच्या भगिनी आणि तळबीडच्या संभाजी मोहिते ह्यांच्या कन्या सोयराबाईसह झाले. ह्या मोहिते घराण्यातील होत्या. ह्यांना राजाराम राजे अपत्य म्हणून प्राप्त झाले. छत्रपती शिवाजी महाराज ह्यांनी चवथे लग्न बाजी प्रभू प्रधान ह्यांची कन्या आणि पालकर घराण्यातील पुतळाबाई पालकर ह्यांचाशी १६५३ मध्ये केले. महाराजांनी देह सोडल्यावर ह्या देखील त्यांच्या समवेत रायगडावर सती झाल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी पाचवे लग्न विचारे घराण्यातील लक्ष्मीबाई विचारे ह्यांच्याशी जावळीच्या गुप्त मोहिमेवर गेलेले असताना १६५६ मध्ये केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे सहावे लग्न गायकवाड घराण्यातील सकवारबाई ह्यांच्याशी १६५७ मध्ये झाले. सकवारबाई गायकवाड या नांदोजीराव गायकवाड ह्यांच्या कन्या आणि शिवरायांचे अंगरक्षक कृष्णाजी गायकवाड ह्यांच्या भगिनी होत्या. ह्यांना कमलबाई म्हणून कन्यारत्नाची प्राप्ती झाली. सिंदखेडच्या जाधव घराण्यातील काशीबाई जाधव ह्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या सातव्या पत्नी होत्या. ह्यांचे लग्न १६५७ रोजी झाले. काशीबाईचे वडील संताजी जाधवराव आणि आजोबा अचलोजी जाधवराव हे आई साहेब जिज़ाऊंचे बंधू होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आठव्या पत्नी होण्याचे मान विदर्भातील चिखलीच्या इंगळे घराण्यातील सरदार शिवाजीराव इंगळे ह्यांची कन्या गुणवंताबाई इंगळे ह्यांना मिळाले. ह्यांचे लग्न १६५७ मध्ये झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांची पहिली जयंती महात्मा ज्योतिबा फुले यांनी पुण्यात १८७० साली साजरी केली होती. रवींद्रनाथ टागोर यांनीही त्याकाळी शिवाजी उत्सव नावाची कविता लिहून शिवाजी महाराजांची स्तुती केली. त्यांच्या त्या कवितेत ते म्हणतात - हे शिवाजीराजा हा देश स्वतंत्र करण्याचा विचार तुमच्या मनात स्फुरला तेव्हा माझी बंगभूमी मूक राहिली. पण तुम्ही दिलेला स्वातंत्र्यप्रेरकतेचा मंत्र कायम आमच्या मनात तेवत राहील.

छत्रपती शिवाजी महाराजांची शिवगर्जना घोषणा

आस्ते कदम आस्ते कदमआस्ते कदम महारा ज, गडपती, भूपती, प्रजापती, गज-अश्वपती, जळपती, सुवर्णरत्नश्रीपती, अष्टवधानजागृत, अष्टप्रधानवेष्टित, न्यायालंकारमंडित, शस्रास्त्रशास्त्रपारंगत, राजनीतीधुरंधर, प्रौढप्रतापपुरंदर, क्षत्रियकुलावतंस, सिंहासनाधीश्वर महाराजाधिराज श्रीमंत श्री श्री श्री राजा शिवछत्रपती महाराजांचा विजय असो.



संकलन
दिनकर जाधव
७०८३२७२७७७

# जीवन दान...!

ज्योतिर्मय साहित्य

माने गुरुजी दवाखान्यात हजर झाले. करीमच्या औषधउ पचारांचा खर्च शिक्षक मंडळी व काही गावकरी करू लागली. पण करीमला बरे होण्यासाठी जवळपास चार ते पाच लाख रुपये खर्च येईल. आणि महत्त्वाचे म्हणजे कोणी किडनी दाताही भेटला पाहिजे.ह्या साऱ्या गोष्टी करीमला मिळाल्या तरच करीम जिवंत राहू शकेल.अन्यथा देवाची मर्जी. या चिंतेपायी सत्तारभाई रोज दवाखान्यात नरसापूरहुन ये-जा करीत.

माने गुरुजींनी करीमच्या बाबतीत घडलेली सारी हकीकत पाणावलेल्या डोळ्यांनी आपल्या पत्नीला सांगितली.या घटनेबद्दल माने पती-पत्नींच्या भावना अनावर झाल्या व ते दोघेही धाय मोकलून रडू लागले. योगायोगाने पुढच्याच महिन्यात माने गुरुजी हे मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त होणार होते. आपल्याला पुत्र नाही म्हणून मनोमनी माने सर करीमला आपलाच पुत्र मानीत होते आणि करीमच्या आई वडिलांची किडनी व रक्तगट हे करीमच्या किडनीशी व रक्त गटाशी जुळत नव्हते. म्हणून शेवटी माने सर व त्यांची पत्नी यांनी असे ठरविले की, आपल्या दोघांची एक - एक किडनी करीमला देऊ, परंतु चिंता ही होती की, माने सर आणि मानेबाई आणि करीम यांच्या किडन्या जुळल्या पाहिजेत व तिघांचे रक्तगट एकच असले पाहिजेत दुसऱ्या दिवशी



मानेसर व त्यांत्या पत्नीने अवयवदानाचे अर्ज भरले. त्यात डॉक्टरांचा सल्ला घेण्यात आला. डॉक्टरांनी माने सरांना सांगितले की, ''तुमच्या तिघांचा रक्तगट सारखाच असावा व तुमच्या किडन्या करीमच्या किडनीशी जुळली गेली पाहिजे. तरच आपल्याला पुढच्या शस्त्रक्रियेची तयारी करता येईल. ''देव तारी त्याला कोण मारी'' या म्हणीची इथे प्रचिती आली. आश्चर्य म्हणजे माने सर व मानेबाई यांचा रक्तगट व किडन्या करीमच्या रक्तगटाशी व किडनीशी अगदी बरोबर जुळली. दवाखान्यात साऱ्यांना आनंद झाला. आता करीमला नवीन किडनी शस्त्रक्रिया करून बसवणार होते. त्यात करीमला उलट्या होणे, वारंवार चक्कर येणे हे बंद होणार होते. आणि खाल्लेले अन्नपचनी पडणार होते. मग ठरल्याप्रमाणे माने सर व त्यांच्या पत्नीने सर्व रीतसर बाबींनी दवाखान्यातील फॉर्म भरून डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे तीन - चार दिवसांनी माने सर व त्यांच्या पत्नींची शस्त्रक्रिया करून एक - एक किडनी काढून करीमला शस्त्रक्रियेद्वारे ती किडनी बसवण्यात आली. काही दिवसांनी करीमची दवाखान्यातून सुटी झाल्यावर त्याला हलके - हलके वाटून उलटी येणे, चक्कर येणे हे बंद झाले. त्याला आता चांगल्या प्रकारे अन्न पचन होऊन सहज चालता - बोलता, उठता बसता येत होते.

करीमला जगण्याची एक नवी संजीवनी मिळालेली होती. नरसापूर गावातील मुख्याध्यापक माने सरांनी व त्यांच्या पत्नीने करीमला किडनीदान करून अवयव दान जागृतीचा एक नवा अध्याय लिहिला आहे. करीमकडे पाहताना या पती - पत्नीला आपण अवयवदान केल्याचे मनोमनी समाधान व आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.



बाल साहित्य

अय्युब पठाण लोहगावकर
पैठण मो.९७६४३ ५०३७४

# मुलांचा अतिलाड काय कामाचा ?

ज्योतिर्मय साहित्य

पुण्यात घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने अल्पवयीन मुले आणि त्यांचे वर्तन हा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे.अपघात खून,चोरी,मारामारी अशा घटनांमध्ये अल्पवयीन मुलांचा असणारा सहभाग समाजमन हदरवून टाकणारा आहे .ज्या वयात मोठी स्वप्ने पाहायची असतात.उत्तम शिक्षण घेऊन आयुष्याला आकार द्यायचा असतो त्या वयात ही अल्पवयीन मुले वाईट सवयीच्या आहारी जावून जाऊन स्वतः चे आयुष्य उध्वस्त करुन घेतात ही बाब खूप वेदना देणारी आहे.

खरं तर आपल्या मुलांच्या जडणघडणीमध्ये पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.पालकाचे वर्तन आणि संस्कार याचा मुलांवर प्रभाव पडतो. पालकांच्या हाती आलेला बक्कळ पैसा, वाढता चंगळवाद, बदलती जीवनशैली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुलांचे अतिलाड यामुळे मुले कुटुंबातील संस्कार, मूल्ये यांना पायदळी तुडवून बेफिकीरपणे वागतात. त्यातून त्यांच्या हातून अनर्थ घडतो. आणि आयुष्य मातीमोल होते.

आजच्या काळात पालकांनी सजग राहणे आवश्यक आहे.आपल्या पाल्याला वाईट सवयी लागण्यासाठी आपण तर जबाबदार नाही ना ? याचा मनाशी विचार व्हायला हवा. चांगल्या सवयी लागायला वेळ लागतो मात्र वाईट सवयी चटकन लागतात.आपल्या पाल्याचे मित्र -मैत्रिणी कोण आहेत ? त्यांच्या चांगल्या सवयी कोणत्या ? त्यांच्या वाईट सवयी कोणत्या ? त्यांचे वर्तन कसे आहे ? या सगळ्या बाबतीत जागरुक राहणं काळाची गरज बनली आहे.

समाजातील आपली प्रतिष्ठा, पत तसेच श्रीमंतीचे प्रदर्शन दाखविण्यासाठी पालक अल्पवयीन मुलांना वाहने चालवायला देतात.त्यावेळी त्यांच्या वयाचा विचार केलेला नसतो.वाहन हातात आल्यावर सळसळत्या रक्ताची ही मुले दुचाकी चारचाकी वाहने सुसाट चालवितात. आणि स्वतः बरोबर इतरांच्या जीवाशी खेळतात.याला सर्वस्वी पालक जबाबदार असतात असे म्हटले तर ते वावगे ठरु नये.

जीवन हे खूप सुंदर असून ते पुन्हा नाही.म्हणून आपल्याला मिळालेले आयुष्य आनंदाने चांगले जगता आले पाहिजे. चुकीच्या सवयी लावून आयुष्य मातीमोल करण्यात कसले आलय शहाणपण ? मान्य आहे संविधानाने आपल्याला स्वातंत्र्य दिले आहे.परंतु त्याचा स्वैराचार होता कामा नये. आपल्या स्वातंत्र्यपायी दुसऱ्याचा जीव घेण्याचा अधिकार आपल्याला कुणी दिला आहे ? याचा विचार होणे गरजेचे आहे.आजकाल पैशाच्या जोरावर नियम, कायदा पायदळी तुडविण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे.कायद्याची कठोर अंमलबजावणी करुन त्या प्रवृत्तीस वेळीच ठेचले पाहिजे.



विद्यार्थ्यांशी हितगुज

लक्ष्मण जगताप,
बारामती
संपर्क : ९४२३२ ४९९९६

खरं तर आपल्या कुटुंबात पालकांचा आदरयुक्त दबदबा असायला हवा.आपल्या पाल्याने चुकीचे काही करताना हजारवेळा विचार करावा इतकी आपल्या संस्काराची वीण घट्ट असायला हवी.

आजची ही अल्पवयीन मुले आपल्या कुटुंबाचा आधारस्तंभ असतात. त्यांच्यावर चांगले संस्कार करणे ही पालक म्हणून आपली खूप मोठी जबाबदारी आहे.पालक म्हणून मुलांना सगळे पुरविणे एवढेच आपले काम नाही तर त्यांच्यावर लक्ष ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे.मुलांचे अतिलाड करुन त्यांना चुकीच्या मार्गावर घेऊन जाण्यास आपण हातभार तर लावत नाही ना? याचा गांभीर्याने विचार करायला हवा.

***






हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559